Indian Streams Research Journal
Vol-1 Issue-1/Feb-2011
ISSN: 2230-7850
Available online www.isrj.net

ORIGINAL ARTICLE

धर्मसमन्वयाचार्य श्री.गुलाबराव महाराजांचे धर्मविचार : एक चिकित्सा

अरविंद देशमुख
सहयोगी प्राध्यापक
गो.सी.टोंपे
कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय
सांदूरबाजार अमरावती

मानव जंगलात भटके जीवन जगत होता तेव्हापासून हळू हळू नीती कल्पना आकारास येत गेल्या.प्राचीन काळात या नीतीकल्पनांना धर्माच्या नावाखाली संघटीत स्वरुप आले. यातूनच जगाच्या अनेक भागात अनेक धर्म उदयास आले.धर्माला नीतीकल्पांनाबरोबर अध्यात्म व ईश्वरनिष्ठा हीही दुसरी बाजू आहे. परंतु धर्माच्या या वाटचालीत अनेक गुढ़ प्रश्न वेळीवेळी उपस्थित करण्यात आले. अशा प्रश्नांना महाराष्ट्रात उत्तर देण्याचे कार्य महाराष्ट्रात विदर्भातील श्री. गुलाबराव महाराज यांनी केले. श्री. गुलाबराव महाराज हे स्वतः नेत्रहीन होते. त्यांच्या काळात शिक्षणाचा अभाव होता. अशा विपरीत स्थितीतही त्यांनी धर्मविचार मांडले इतकेच नव्हे तर ते ग्रंथित केले. त्यांचे धर्मविचार आजच्या धावपळीच्या युगात मानवी जीवनात सुख, शांती व समाधान यांची पुरस्थापना करणारेच आहेत.

समाज व धर्माची गरज

'धर्म' हा समाजाचा मूलाधार आहे. धर्मातील नीतीनियमांनी मानवी जीवन बांधलेले आहे. तसा मानव हा प्राणीच आहे.त्याच्यातही पशुत्व आहे. या पशुत्वावर नियंत्रण ठेवण्यासाठी,मानवाच्या दुष्टप्रवृत्तीवर नियंत्रण रहावे आणि तो सदाचारी बनावा, त्याने माणसाबरोबर माणुसकीचा व्यवहार करावा. मानवी स्वभावातील राग, लोभ, मत्सर, द्वेष, तिरस्कार व अहंकार या षड़विकारावर नियंत्रण रहावे या हेतूनेच जगात धर्म निर्माण झाले आहेत.याच हेतूनेच पाप–पुण्य,स्वर्ग–नरक या कल्पना निर्माण झाल्या आहेत. आज सर्वत्र धर्माच्या नावाखाली धर्मांधता अंधश्रध्दा व कर्मकांड वाढत आहे. जुन्या अंधश्रध्दा मागे पडत आहेत पण नवीन अंधश्रध्दा निर्माण होत आहेत.तर कांही दहशतवादी संघटना धर्माच्या नावाखाली सर्वत्र हिंसक कारवाया करत आहेत. या पार्श्वभूमीवर श्री. गुलाबराव महाराज यांचा धर्मविचार समजून घेणे आवश्यक आहे.

धर्माबाबत विविध मतप्रवाह

'धर्म' ही कल्पना विश्वातील मानवी जीवन व्यापणारी आहे.त्यामुळेच प्राचीन काळापासून अनेक ग्रंथामध्ये तसेच विविध विद्वानांनी धर्माबाबत मते मांडली आहेत.

1. महर्षी व्यास यांनी धर्माबाबत खालील विचार व्यक्त केला आहे.
   धारणात धर्मनित्याहुधर्मेण विधृताः!
   यःस्यात् धारण संयुक्तः स धर्म इति निश्चयः!!1!!
   याचा अर्थ असा की, धारण`रण्याचे सामर्थ्यामुळे धर्माला ''धर्म'' असे सार्थ नाव प्राप्त झालेले आहे,धर्मानेच प्रजा बद्ध होते. म्हणून प्रजेचे धारण करतो , रक्षण करतो तोच धर्म.
2. नारायणोपनिषदात धर्माबाबत असे म्हटले आहे की, ''धर्मो विश्वस्य जगत् प्रतिष्ठा ! धर्मे सर्व प्रतिष्ठितम्''
   याचा अर्थ असा की, धर्मामुळेच जगाला स्थैर्य व प्रतिष्ठा प्राप्त होते.
3. याज्ञवल्क्य ऋषी यांनी खालील श्लोकात धर्माची नउु लक्षणे सांगितली आहेत.
   ' अहिंसा सत्यमस्तेयं शौचमिन्द्रियनिग्रहः!
   छानं दमो दया शांन्तिः सर्वेषा धर्मसाधनम् !!
   याचा अर्थ असा की,अहिंसा, सत्य, अस्तेय–चोरी न करणे, अंतर्बाहय शुचिता, इंद्रियनिग्रह, दान, निषिद्ध विषयाचे चिंतन न करणे , दीन दुबळयांवर दया करणे, चित्ताचा क्षोभ न होउु देणे ही धर्माची प्रमुख साधने आहेत.
4. स्वामी विवेकानंद धर्माबाबत म्हणतात की, धर्म म्हणजे माणसामधील आध्यात्मिक किंवा दैवीशक्तीची अभिव्यक्ती होय.
5. महात्मा गांधीजी धर्माबाबत म्हणतात की,'' जो माणसाचा स्वभावच पालटून टाकतो अंतरातील सत्याशी पक्की गाठ घालतो आणि अंतःकरण नित्य शुद्ध करीत असतो तो धर्म होय.
6. संत तुकाराम महाराज धर्माबाबत म्हणतात की, '' धर्माच्या रक्षणासाठी आम्हांला सायास करावे लागतात. 'धर्म रक्षावयासाठी करणे आटी आम्हांसी 'म्हणजे धर्मपालनावरच संपूर्ण विश्वाचे सुख अवलंबून आहे.
7. आज जगाला नाही म्हटले तरी अणुयुध्दाच्या सावटाखाली वावरावे लागत आहे. या पार्श्वभूमीवर डॉ.झिवॅगो यांनी आपल्या नोबेल पुरस्कार मिळालेल्या कादंबरीत म्हणतात की,''During our short span of life, we must find own indsights into our relationship with the existence in which we participate so briefly Otherwise we cannot live. This means as we see it. A departure from the materialistic view of the nineteenth century. It,means a reawakening of the sprtitul world of our innes life of religion"
   ''जर या भयग्रस्त परिस्थितीत माणसाला सुखासमाधानाने जगायचे असेल, शांती हवी असेल तर भौतिकतेच्या मागे न धावता , अंतर्मुख होउुन

आत्मतत्वाचा शोध घेणे व त्यासाठी धर्म आणि अध्यात्म यांची कास धरणे हाच एकमेव मार्ग होय''.

धर्म प्रेषितांचे योगदान

मानवी जीवनात समाधान आणण्याबरोबरच धर्मप्रेषितांनी त्यास आध्यात्मिक अधिष्ठान दिले आहे.माणसाला आपल्या मूलभूत गरजांइतकीच आध्यात्मिक, आत्मिक भूक असते,दिव्यत्वाची ओढ असते, सृष्टी निर्मात्याबदद्ल कुतूहल असते आणि त्याच्याप्रती कृतज्ञताही असते. याची जाणीव सा–या धर्म प्रेषितांना होती. प्रत्येकाचे जीवन सुखी समृध्द कसं होईल याचे त्यांनी सतत,निस्पृह,निरपेक्ष व निस्वार्थपणे चिंतन केले. प्रेम, दया, बंधुभाव, दान, त्याग, परोपकार, समर्पण इत्यादी दैवी गुणसंपदा मानवाच्या मनावर बिंबवायचा त्यांनी सर्वार्थाने प्रयत्न केला. केवळ शारीरिक पातळीवर राहणा–या मानवजातीला एका उच्च पातळीवर,आत्मिक , आध्यात्मिक पातळीवर नेण्यासाठी ईश्वरीय अधिष्ठानाचा आधार घेतला. महाराष्ट्रातही वारकरी संप्रदायातील संतानी बहुमोल योगदान दिले. त्यांनी धर्मविचारातून माणसाला जगण्याची ,कठीण प्रसंगाला अतिशय धीरोदत्तपणे सामोरे जाण्याची, वेळप्रसंगी संघर्ष करण्याची शक्ती दिली. जीवन आहे त्यापेक्षा अधिक सुंदर करण्याची मनीषा त्यांच्या ह्दयात जागवली. संजीवनी खेर या संताच्या कार्याबाबत म्हणतात की,वेगवेगळया काळी ,देशी जन्मलेले दिव्य आत्मे/महात्मे मानवाच्या कल्याणासाठी, त्यानं सुखसमाधानाने जगावं यासाठी झटले, याचेच दर्शन विविध धर्मामध्ये जाणवते.

गुलाबराव महाराज यांचे धर्मविचार

गुलाबराव महाराज ही 20 व्या शतकातील अलौकिक विभूती. त्यांचा जन्म 6जुलै 1881रोजी लोणी टाकळी येथे झाला. त्यांच्या आईचे नाव अलोकाबाई व वडीलांचे नाव गोदुजी मोहोड/माधानचे पाटील असे होते. गुलाबराव महाराज यांनी 20 सप्टेंबर 1915 रोजी पुणे येथे ब्रम्हस्थानी प्रस्थान केले. व्यावहारिक दृष्टीने पाहिले तर महाराजांना कोणीही शिकविले नाही. त्यांना सर्व विदया ज्ञानेश्वर महाराजांनीच दिली.त्यांनी आपली जीवनविषयक भूमिका व अवतार कार्याचे प्रयोजन अत्यंत स्पष्ट शब्दात विशद केले आहे. ते म्हणतात की, आर्यांचे म्हणणे योग्य आहे हे सिध्द करण्याशिवाय मला व माझया हितचिंतकांना कोणतेही काम नाही.याशिवाय ते पुढे म्हणतात की, 'बले करून मला अधर्मात ओढून नेले तरी मी तोंडाने धर्म सुचवून मरेन'. यावरून त्यांची धर्मनिष्ठा दिसून येते. त्यांनी जो धर्मविचार मांडला आहे. तो विश्वकल्याणकारी आहे.विनाशाच्या गर्तेकडे वेगाने वाटचाल करीत असलेल्या मानवजातीची मुक्तता करण्याची गरज आहे. यादृष्टीने श्री. गुलाबराव महाराज

यांचा 'धर्मच सर्व अनिष्ट गोष्टींना प्रतिबंध करू शकतो. म्हणून धर्म प्रेम वृध्दिंगत केले पाहिजे.' हा विचार महत्वपूर्ण ठरतो. याशिवाय पुढे ते म्हणतात की,'धर्माकरिता समाज आहे म्हणजेच धर्माकरिता माणूस आहे आणि मुख्य लक्षण शास्त्रचोदना म्हणजे शास्त्राज्ञा, धर्माज्ञा आहे.' त्यांच्या मते इतर धर्मियांनी आपआपल्या धर्म वा उपासना पध्दतीचे निष्ठेने पालन केल्यास त्यांनाही परंपरेने हिंदु धर्माची प्राप्ती होउुन ते मोक्षाचे अधिकारी होउु शकतात. किंवा एखादया अन्य धर्मियांस आजच मोक्षाची तीव्र इच्छा झाल्यास व त्याने हिंदु तत्वज्ञानाचा अभ्यास केल्यास त्यालाही मोक्ष प्राप्तीचा लाभ होउु शकतो.आधुनिक काळातही कांही तत्ववेत्त्यांनी धर्माबाबत कांही चिंतन मांडले आहे.त्यापैकी रॉस हा शिक्षणशास्त्रज्ञ म्हणतो की, जीवनातील श्रेयस काय याचे दर्शन घडविण्याचे व श्रेयस प्राप्तीसाठी प्रेरणा देण्याचे काम धर्मच करू शकतो. तत्वज्ञानान्तर्गत आध्यात्मिक मूल्ये व धर्मसिध्दांत धर्माचरणातूनच मूर्त स्वरूपात प्रगट होतात.'तर मुकेन हा शास्त्रज्ञ धर्मासंबंधी म्हणतो की, 'संपूर्ण जीवन हे धर्ममयच असले पाहिजे. नव्हे धर्म हेच जीवन बनले पाहिजे'. महात्मा गांधीजीनींही धार्मिक शिक्षणावरील आक्षेपांचा परामर्श घेत स्पष्ट केले आहे की,The evils of religious instruction will vanish with the evolution of the true religious spirit. To give up religious instruction is like letting the dield fallow and grow weeds for want of the tiller's knowledge of the proper use of the firld. भारत स्वंतत्र झाल्यानंतर डॉ. राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन झालेल्या विद्यापीठ शिक्षण आयोगाने व कोठारी आयोगानेही धार्मिक शिक्षणाचे महत्व प्रतिपादित केलेले होते.श्री. गुलाबराव महाराजांनी प्रतिपादित धर्मविचाराला या सर्वांनी एकप्रकारे मान्यताच दिली आहे.यातून श्री. गुलाबराव महाराज यांचे धर्मविषयातील द्रष्टेपण सहज दृग्गोचर होते. श्री. गुलाबराव महाराजांचे धर्मारूढ जीवन हे आधुनिक विज्ञानवाद्यांनाही एक आव्हानच आहे. 'धर्माचा निर्विकार पध्दतीने विचार करणारा शुद्रवर्गात सुष्टीमध्ये मी एकटाच आहे असे तू पक्के समज'.या वाक्यावरून त्यांच्या धर्ममताचे महत्व अतिशय स्पष्ट होते.धर्म हा त्यांच्या विचारांचा प्रमुख विषय होता, नव्हे नव्हे त्यांच्या समग्र चिन्तनविषयांचा मूलाधार धर्म होता. त्यांतही विशेष गोष्ट ही की, हे त्यांचे चिंतन एकांगी किंवा अंधश्रध्दामूलक नव्हते. अल्पायुष्यात लाभलेल्या सर्वज्ञतेमुळे त्यांच्या धर्मविचाराचे मोल विशेष आहे.

श्री. बाबा महाजन,अकोट हे त्यांचे पद्यचरित्रकार होय. त्यांनी ''गुलाब–गौरव'' या ग्रथांत त्यांच्या अंधतेचा उल्लेख करीत मोठा अंतर्मुख करणारा प्रश्न वाचकांना विचारला आहे. ते म्हणतात की,

'' बालांध म्हणती याला! ळा मार्ग दावी सकला !
ज्नहो! तुम्हीच बोला! हा काय न्याय झाला!

याशिवाय पू.स्वामी गोविंददेव गिरी , पुणे पूर्वाश्रमीचे पू. आचार्य किशोरजी व्यास यांनी श्री.गुलाबराव महाराजांच्या धर्म विषयक चिंतनाचा गौरव आपल्या ''गुलाब– सौरभ'' या गीतात केलेला आहे.त्यात त्यांनी श्री. गुलाबराव महाराजांचे धर्मविचार विश्वकल्याणकारी आहेत. एवढे त्यांचे सामर्थ्य आहे असे निःसंदिग्ध शब्दात व्यक्त केले आहे.शिवाय त्यांनी गुलाबराव महाराजांच्या व्यक्तीमत्वात ऋषित्व ,आचार्य व संतत्व अशा तिन्ही गोष्टी साकारलेल्या होत्या असे म्हटले आहे.

सारांश

एकूणच श्री. गुलाबराव महाराज यांचे धर्मविषयक विचार लवचिक, व्यापक व सर्वांना त्यांच्या श्रध्देसह सामावून घेणारे आहेत. तसेच विविध धर्मात वा पंथात आचार धर्मव तत्वज्ञानाचीही भिन्नता असते. ईश्वराच्या स्वरूपाला घेउुन विविध मतप्रवाह असतात. त्यासंबंधी ब–याच वेळेला टोकाचे वाद होतात. श्री. महाराजांचा विशेष हा आहे की त्यांनी या सर्व भिन्नतेचा विचार अधिकार भेदानुसार करून , धर्माचया मूळ तत्वानुसार समन्वयच केला आहे. ही बाब अधिक समजून घेण्यासाठी धर्म आणि पंथ यांचा मुळातून विचार करणे आवश्यक आहे.

संदर्भ

1. चौगुले वि. शं. ––––––संत समाज आणि अध्यात्म, मधुरा प्रकाशन,ठाणे

2. निर्मिती व्यवस्थापक,ग्रंथनिर्मिती केंद्र, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक ––––––महानुभव व संतवाङ्:मय

3. अध्यात्म ग्रंथमाला ग्रंथांक 2, संतवचनामृत, श्री. गुरूदेव रानडे प्रकाशक श्री. गुरूदेव रानडे समाधी ट्रस्ट निंबाळ ,जि, विजापूर

4. डॉ. यु.म. पठाण यांचे अध्यक्षीय भाषण , प्रकाशक स्वागताध्यक्ष, चवथे महाराष्ट्र संत साहित्य संमेलन, अचलपूर शहर, जि. अमरावती

5. संत साहित्य : सौंदर्य आणि सामर्थ्य डॉ. निर्मलकुमार फडकुले यांचे मनोगत स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद

6. ग.बा. सरदार–––– संतवाङ्:मयाची सामाजिक फलश्रुती, श्री. विद्या प्रकाशन, पूणे

7. डॉ. यु.म. पठाण–––––––संत साहित्य चिंतन प्रकाशिका अल्मास पठाण, औरंगाबाद

8. डॉ. मुकुंद दातार––––––––– वारकारी संप्रदायाची प्रस्थानत्रयी, स्नेहल प्रकाशन,पुणे